# पनवेल महानगरपालिका

**// जाहीर सूचना //**

**विषय :-** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये पनवेल महानगरपालिकेच्या सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजना प्रसिध्दीवर प्राप्त सूचना/हरकतीच्या अनुषंगाने सुनावणी बाबत.

पनवेल महानगरपालिकेची सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ रोजी महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र क्र. ७२ नुसार प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर प्रारूप विकास योजना प्रसिद्धीच्या अनुषंगाने ३० दिवसांच्या विहित मुदतीत सुचना व हरकती मागविल्या होत्या. सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजनेवर विहीत मुदतीत पनवेल महानगरपालिकेकडे प्राप्त सूचना/हरकतीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २८(२) अन्वये सुनावणी घेण्यासाठी नियोजन समिती गठीत करण्यात आलेली आहे.

सदर नियोजन समितीमार्फत दि. ०६/०१/२०२५ पासून आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, तिसरा मजला, आर्ट गॅलेरी, पनवेल - ४१०२०६ या ठिकाणी सुनावणी घेण्यात येत आहेत. **उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे विहित मुदतीत ज्यांनी पनवेल महानगरपालिकेकडे सुचना / हरकती नोंदविल्या आहेत परंतु ज्यांना सुनावणीचे पत्र प्राप्त झाले नाही त्यांनी नियोजन समिती समोर आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. २९/०१/२०२५ रोजी दुपारी २:०० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत** खालील नमुद पत्यावर सूचना / हरकतींचे पत्र व इतर आवश्यक कागदपत्रांसह कृपया उपस्थित रहावे. तसेच, सुनावणी करिता आपल्या तर्फे प्रतिनिधी हजर राहणार असल्यास सदर प्रतिनिधीस आवश्यक ते प्राधिकारपत्र देण्यात यावे.

सदर सुनावणीस आपण अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहीले नाही तरी आपल्या संदर्भिय लिखीत अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने आपल्या अनुपस्थितीत नियमानुसार उचित निर्णय घेण्यात येईल.

(मंगेश चितळे)
आयुक्त तथा प्रशासक
पनवेल महानगरपालिका

पत्ता :- आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, तिसरा मजला, आर्ट गॅलेरी, पनवेल – ४१०२०६

जा.क्र.पमपा/नरवि/वि.यो.वि.घ/५०-२५/८०६१ /२०२५,
दि.२४ /०१/२०२५